जनसंपर्क कक्ष
2 1 JUL 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभासाठी अर्ज भरण्याच्या तारखा प्रसिद्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ डिसेंबर २०१७ किंवा जानेवारी २०१८ मध्ये होणार आहे. पदवी, पदव्युत्तर आणि पदविका प्रमाणपत्रासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील विहीत नमुन्यात अर्ज भरावा. ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी पेमेंट गेटवे सुविधा ॲक्सीस बँकेच्या ९१५०२००५५३८६८७५ या खाते क्रमांकावर उपलब्ध केली आहे. या खाते क्रमांकावर २५० रुपये नियमित शुल्क भरून २० जुलै ते ३१ ऑगस्ट या कालावधीत अर्ज करावयाचा आहे. ॲक्सीस बँकेचा आयएफएससी कोड UTIB0000134 असा आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन दिलेल्या वेळेत अर्ज भरावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षांत समारंभासाठी पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरून त्याची प्रिंट, आयडेंटी साईज दोन फोटो, आधारकार्डची सत्यप्रत आणि अंतिम वर्षाचे गुणपत्रक जोडून परीक्षा भवनमध्ये अर्ज जमा करावा. ज्या परीक्षांचे निकाल लागले आहेत, त्या परीक्षांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्या परीक्षांचे पदवी प्रमाणपत्र मागणी ऑनलाईन करावी. दीक्षांत अर्ज भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत, त्यांनी स्वत:च्या फोटोची जीपीईजी फाईल अपलोड करून नंतर अर्ज ऑनलाईन भरावा. या फोटोची पदवी प्रमाणपत्रावर छपाई ब्लॅक ॲन्ड व्हाईट होईल. आधारकार्ड नंबर अचूक देणे आवश्यक आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अर्जामध्ये नमूद करावा.

दीक्षांत समारंभाचे निमंत्रण व सविस्तर माहिती



- शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सविस्तर माहिती उपलब्ध
- कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती

एसएमएसव्दारे कळविण्यात येणार आहे. वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटरशिप पूर्ण झालेल्या सर्टिफिकेटची प्रत जोडणे आवश्यक आहे. ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam नंतर जाहीर करण्यात येतो, त्या परीक्षेच्या दीक्षांत अर्जासोबत Declaratiom of Result Letter/ Award Letter ची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधार झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षांत अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे.

श्रेणी सुधारणा झाली नसेल तर अर्ज करू नये. दीक्षांत समारंभापूर्वी यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. अपुऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, किंवा त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. यांची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहनही विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

**दीक्षांत समारंभासाठी अर्ज करावयाच्या तारखा**

- नियमित शुल्क २५० रुपये भरून २० जुलै ते ३१ ऑगस्ट या कालावधीत अर्ज करावा.
- विलंब शुल्क ३५० रुपये भरून १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत अर्ज करावा.
- अतिविलंब शुल्क ८५० रुपये भरून १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत अर्ज करावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JUL 2017
Times of India

# Applications invited for SUK degree certs

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited applications for the degree certificates for undergraduate and post-graduate students, who have cleared their final year exams between October 2016 and April 2017.

The certificates will be conferred to them during the 54th convocation ceremony which is likely to be held next year in the month of January or February.

"Students who have the cleared exam between October 2016 and April 2017 can apply for the degree certificates from July 20 to August 31, with regular fees. Students can also apply with late fees from September 1 to September 15. The facility will also remain available from September 16 to September 30 with super late fees," an SUK circular read.

The convocation application format is available at the official website www.unishivaji.ac.in.

It is mandatory for the students to fill details such as their email id and the mobile number, in order to make proper communication of the event. Apart from this, students must make sure to fill in their Aadhaar card details without fail.

"Students should send their applications within time, as not only will it be good for the university to process the applications, but it will also have less burden on students pockets," an SUK official said.

"The regular fee for the degree certificate is Rs 250 and if the students fails to make an entry on time, they will have to pay Rs 350 as late fee or Rs 850 if they are submitting their applications even late. The university has started the online payment gateway facility from last year," the official added.

When asked about the convocation ceremony to another official, he said, "We are expecting applications from around 35,000 to 45,000 students this year. The instructions have already been posted online. If students are still facing any problem, he/she can contact the university officials for assistance."

**DATES TO REMEMBER**

- Regular fee: July 20 to August 31: Rs 250
- Late fee: September 1 to September 15: Rs 350
- Super late fee: September 16 to September 30: Rs 850



2 1 JUL 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
NAAC 'A' Grade

## ५४ वा दीक्षान्त समारंभ विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ डिसेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ दरम्यान नियोजित आहे.
- ऑक्टोबर २०१६ व एप्रिल २०१७ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन आणि खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षान्त अर्ज करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. २० जुलै २०१७ ते ३१ ऑगस्ट, २०१७ | पर्यंत शुल्क | रू.२५०/- |
| २. १ सप्टेंबर, २०१७ ते १५ सप्टेंबर, २०१७ | पर्यंत विलंब शुल्क | रू.३५०/- |
| ३. १६ सप्टेंबर, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७ | पर्यंत अतिविलंब शुल्क | रू.८५०/- |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज (Convocation Application) www.unishivaji.ac.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन भरुन त्याची प्रिंट घ्यावी व अर्जासोबत आयडेंटीटी साईज. दोन फोटो आधारकार्डाची सत्यप्रत आणि अंतिम वर्षाच्या गुणतक्त्याची प्रमाणित प्रत इत्यादी जोडाव्यात. अर्जामध्ये पत्ता पूर्ण आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी.

**ऑन लाईन अर्ज भरताना प्रथम वेबसाईटवरील सूचना वाचाव्यात.**

- ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत अशा परीक्षांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे त्यां परीक्षांचे पदवी प्रमाणपत्रा मागणी अर्ज ऑन लाईन प्रोसेस होतील.
- दीक्षान्त अर्ज ऑन लाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG file अपलोड करून नंतरच अर्ज ऑन लाईन भरावा. सदरचा फोटो पदवी प्रमाणपत्रावर Black & White रंगात छपाई होईल. **विद्यार्थ्यांनी आधारकार्ड नंबर अर्जामध्ये बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.**
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. दीक्षान्त समारंभाचे निमंत्रणपत्र व तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांना SMS द्वारे कळविण्यात येईल. ऑन लाईन पैसे भरण्यासाठी खालील बँकेच्या खात्यावर पेमेंट गेट-वे सुविधा दि.२० जुलै २०१७ पासून ॲक्टीवेट करून देण्यात येईल.

| अ.नं. | बँकेचे नांव | IFSC Code | Account No. |
|---|---|---|---|
| 1 | AXIS BANK | UTIB0000134 | 915020055386875 |

- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत जोडणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam.नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षान्त अर्जासोबत Declaration of Result letter/Award letter ची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. (उदा. Ph.D/M.Phil etc.)
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षान्त अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा.चूकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार पोहचू शकला नाही तर विद्यापीठ यंत्रणा जबाबदार राहणार नाही
- दीक्षान्त समारंभापूर्वी यादी विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.
- अपु-या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

श्री. महेश काकडे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षान्त विभाग
दि.२१/०७/२०१७

2 1 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'प्लेन बॉईज'चे सामाजिक दातृत्व ...

## गरजूंना देतात मदतीचा हात; पार्ट टाईम जॉब करत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास

कोल्हापूर, ता. २० : रस्त्यावर थांबायचे. एकाद्या मोपेडच्या शीटवर केक ठेवायचा. फटाक्याची माळ लावायची. केक कापायचा आणि पार्टीला जायचे. तरुणांचे वाढ दिवस साजरा करण्याचे हे 'फ्याड' शहरातील गल्लीबोळात दिसत आहे. पण त्याला अपवाद ठरले आहेत, प्लेन बॉईजचे 'ते' आठ जण. प्रत्येक जण त्यांचा वाढदिवस वृद्धाश्रम, गरजूंना मदत, दानधर्म, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, जुन्या वस्तू दुरुस्त करून गरजुंना देण्याचे काम करून आपला वाढदिवस साजरा करतात. स्वतःचा पार्ट टाईम जॉब सांभाळून एमपीएससीचा अभ्यास करीत तेही माणूसकी जपत आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या विमान (प्लेन) इमारतीत अभ्यास करण्याच्या निमित्ताने त्यांनी ओळख झाली. सर्वांचेच एक ध्येय होते एमपीएससी पूर्ण करायची. त्यांनी एक ग्रुप तयार केला. त्याला नाव दिले. 'प्लेन बॉईज'. सर्वांना अधिकारी व्हायचं आहे. पण आर्थिक परस्थिती नसल्यामुळे त्यांना उचित ध्येयापर्यंत पोहचण्यात अनेक अडथळे येत आहे. तरीही त्यांनी जिद्द सोडलेली नाही. यातील एक निखिल आनंदराव साळोखे. ट्रॉफी तयार करण्याच्या दुकानात तो काम करतो. सकाळी सहा ते दहा ही त्याची



'प्लेन' मध्ये अभ्यास करण्याचा वेळ. त्यानंतर ट्रॉफीच्या दुकानात कामाला यायचे आणि सहापर्यंत तेथे थांबायचे. या नोकरीतून मिळणाऱ्या खर्चातून स्वतःचा आणि अभ्यासासाठीचा खर्च पूर्ण करायचा. दुसरा महादेव पाटील. आता तो कॉन्स्टेबल म्हणून नोकरीस लागला आहे. तरीही तो प्लेन बॉईजमध्ये आजही सक्रीय असतो. अमोल कांबळे रत्नागिरी तहसिल कार्यालयात लिपिक म्हणून नोकरी लागला आहे. तरीही त्याला एमपीएससी पूर्ण करायची आहे. राहूल पाटील सध्या मुंबईतील एका बँकेत नोकरी करीत आहे. स्वप्नील गावडे आणि सचिन गावडे दोघे भाऊ त्यांनाही 'पीएसआय' व्हायचं आहे. अर्जुन कांबळे मोरेवाडीतील तोही 'एमपीएससी'चा अभ्यास करीत आहे. अजिंक्य पाटील हा पोलिस कॉन्स्टेबल आहे. या सर्वांची सध्या राहण्याची ठिकाणे वेगवेगळी असली तरीही त्यांना एमपीएससी पूर्ण करून अधिकारी व्हायचे आहे.

'महाराष्ट्र' म्हणून व्हॉट्स ॲप ग्रुप तयार केला आहे. ते सर्वांच्या संपर्कात आहेत. त्यातील प्रत्येकाचा वाढदिवस ते वृद्धाश्रमात जेवण देवून, वृक्षारोपण करून साजरा करतात. वाजागाजा न करता कोणाच्या घरी नवीन टीव्ही आणला तर जुना स्वतःकडे घेतात. तो दुरुस्त करतात आणि गरजुंना देतात. ज्या मुलांना शैक्षणिक साहित्यच नाही, त्यांच्यासाठी ते पदरमोड करून खर्च करतात. केवळ वाढदिवसा दिवशीच नाही तर इतर वेळी सुद्धा 'प्लेन बॉईज' म्हणून माणुसकी जपत आहेत. सामाजिक कामाची प्रसिद्धी नको, फकत माणुसकी जपायची आहे एवढंच ते सांगतात.

जनसंपर्क कक्ष
2 1 JUL 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेट निवडणुकीसाठी माहिती पाठविण्यास मुदतवाढ

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) व विद्यापरिषद (अॅकॅडेमिक कौन्सिल) निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्याकरिता संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना सोमवारपर्यंत (ता. २४) मुदतवाढ देण्यात येत आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

राज्यात १ मार्च २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम- २०१७ लागू झाला आहे. त्या अनुषंगाने विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. अधिसभा व विद्यापरिषद निवडणुकीच्या मतदार याद्यांसाठी प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती ३० जूनपर्यंत पाठविण्याबाबत संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना आस्थापना पीजी विभागाकडून १५ जूनला ई-मेल पत्राद्वारे कळविण्यात आले होते. याला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. या अनुषंगाने आज अखेर एकूण २८१ महाविद्यालयांपैकी साधारणतः ११६ महाविद्यालयांतील शिक्षकांची माहिती प्राप्त झाली आहे. अद्यापही १६५ महाविद्यालयांकडून शिक्षकांची माहिती, तसेच अजूनही काही प्राचार्य व संस्था प्रतिनिधी यांची माहितीही शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेली नाही. अधिसभा व विद्यापरिषद या अधिकार मंडळांमध्ये शिक्षक, प्राचार्य, संस्था प्रतिनिधी यांचे प्रतिनिधित्व महत्त्वाचे असल्याने व प्राप्त झालेल्या माहितीचे प्रमाण कमी असल्याने संबंधित घटकांकडून माहिती पाठविण्याची मुदत सोमवारपर्यंत पुनःश्च वाढविण्यात आली आहे, असे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.



## ग्रामीण पत्रकारांसाठी जर्नालिस्ट मिट

युनिसेफ महाराष्ट्र व शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि कम्युनिकेशन सायन्स विभागातर्फे ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी दहा ऑगस्टला जर्नालिस्ट मिटचे आयोजन करण्यात आले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. बालमृत्यू दर कमी करणे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, या विषयावर आधारित या जर्नालिस्ट मिटमध्ये विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. जर्नालिस्ट मिटसाठी प्रवेश मर्यादित असल्याने सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पत्रकारांना नावनोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच, नावनोंदणी केलेल्या पत्रकारांनी या मिटमध्ये दिवसभर थांबणे अनिवार्य असेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JUL 2017
पुढारी

# माहिती पाठविण्यास २४ जुलैपर्यंत मुदतवाढ

## विद्यापीठ अधिसभा व विद्यापरिषद निवडणूक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा व विद्यापरिषद निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याकरिता प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्यासाठी संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना सोमवारपर्यंत (दि. २४ जुलै) पुन्हा मुदतवाढ देण्यात येत असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी कळविले आहे.

याबाबत माहिती अशी की, राज्यात १ मार्च २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ लागू झाला आहे. त्या अनुषंगाने विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. अधिसभा व विद्यापरिषद निवडणुकीच्या मतदार याद्यांसाठी प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्यासाठी संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना आस्थापना पी.जी. विभागाकडून १५ जून २०१७ रोजीच्या ई-मेल, पत्राद्वारे ३० जूनपर्यंत पाठविण्यासाठी कळविण्यात आले होते. या अनुषंगाने आजअखेर एकूण २८१ महाविद्यालयांपैकी साधारणत: ११६ महाविद्यालयांतील शिक्षकांची माहिती प्राप्त झाली आहे. अद्यापही १६५ महाविद्यालयांकडून शिक्षकांची माहिती तसेच अजूनही काही प्राचार्य व संस्था प्रतिनिधी यांची माहितीही शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेली नाही.

2 1 JUL 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कुलपतींकडून प्रशस्तिपत्र : अन्य विद्यापीठांच्या तुलनेत सर्वाधिक ११६८ परीक्षा; ३५४ परीक्षांचे निकाल जूनअखेर जाहीर**

# शिवाजी विद्यापीठाची निकालात आघाडी

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राज्यातील अन्य विद्यापीठांच्या तुलनेत सर्वाधिक ११६८ परीक्षा घेऊनदेखील गेल्या दहा वर्षांपासून शिवाजी विद्यापीठाचे निकाल वेळेत जाहीर होत आहेत. यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर, परीक्षापूर्व आणि परीक्षेनंतरच्या कामकाजाचे सूक्ष्म नियोजन, परीक्षेचा कमी केलेला कालावधी, आदी स्वरुपांतील विद्यापीठाची वर्षागणिक पडणारी नवी पावले उपयुक्त ठरली आहेत. वेळेत निकाल जाहीर केल्याबद्दल विद्यापीठाला कुलपतींनी आतापर्यंत दोन वेळा प्रशस्तिपत्र देऊन गौरविले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा वेळेत होत नाहीत, त्या विद्यापीठाच्या १२, लाख प्रश्नपत्रिका आठ दिवसांत तपासण्याचे अवघड आव्हान विद्यापीठासमोर आहे. कुलपतींनी या विद्यापीठाला विलंबाबद्दल फटकारले आहे. त्या पार्श्वभूमीवर 'लोकमत'ने शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा पद्धतीची माहिती घेतली असता एकेकाळी ग्रामीण विद्यापीठ म्हणून हिणवले जाणारे हे विद्यापीठ राज्यात सगळ्यात पुढे असल्याचे चित्र समोर आले.

प्रत्येक शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठ हिवाळी व उन्हाळी सत्रांत पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकांच्या ११६८ परीक्षा घेते. सत्र पद्धतीमुळे परीक्षाविषयक कामाचा भार वाढला आहे. त्यातून ३० ते ४५ दिवसांत निकाल लावण्यासाठी विद्यापीठाने गेल्या दहा वर्षांत महत्त्वपूर्ण पावले टाकली आहेत. यात ८० दिवसांचा परीक्षांचा कालावधी ४२ दिवसांवर आणला. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणीसाठी प्राध्यापकांना अधिक वेळ मिळत आहे. परिणामी उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेतील गुणवत्ता व गती वाढली. परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत परीक्षा विभाग आणि महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. परीक्षापूर्व आणि नंतरच्या विविध स्वरुपांतील कामांसाठी 'डिजिटल युनिव्हर्सिटी-डिजिटल कॉलेज' कक्ष, सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (गोपनीय व नियंत्रित पद्धतीने प्रश्नपत्रिका वितरण), आदी स्वरुपांतील तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला आहे. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून वेळेत निकाल जाहीर करण्यात यश आले आहे.

### ४५ दिवस.. ९० टक्के निकाल

या वर्षीच्या उन्हाळी सत्रात विद्यापीठाने ६०० परीक्षा घेतल्या. त्यातील ३५४ परीक्षांचे निकाल जूनअखेर जाहीर झाले. गुरुवारअखेर ५०२ परीक्षांचे निकाल लागले आहेत. यातील ९० टक्के परीक्षांचे निकाल ४५ दिवसांत जाहीर केले असल्याचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी सांगितले.

## परीक्षा विभागाने काय केले?

परीक्षा विभागाने उत्तरपत्रिका तपासणीसाठीच्या केंद्रांची (कॅप) संख्येत वाढ केली. त्यातून कामाची विभागणी होऊन गतीमध्ये वाढ झाली. शिवाय या केंद्रांवर 'क्वालिटी डायरेक्टर'ची नेमणूक केली. परीक्षकांनी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनानंतर संबंधित उत्तरपत्रिकांतील सर्व प्रश्न तपासले आहेत का?, त्यासाठी केलेल्या गुणदानाची बेरीज योग्य आहे का? याची तपासणी हे 'क्वालिटी डायरेक्टर' करतात. या केंद्रातूनच ऑनलाईन गुण विद्यापीठाला सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली. कॅपमधील कामकाजाच्या तपासणीसाठी विद्यापीठातील 'ऑन सेक्शन'मधील अधिकाऱ्यांची भरारी पथके केली. यातून निकालासाठी लागणारा १५ दिवसांचा कालावधी आठवड्यावर आला.



## दृष्टिक्षेपात

- दोन सत्रांत घेणाऱ्या परीक्षांची संख्या : ११६८
- परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या : ५ लाख ७५ हजार
- एका सत्रात तपासल्या जाणाऱ्या उत्तरपत्रिका : २२ लाख

परीक्षा विभागाचे योग्य नियोजन व व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा परीक्षा कामकाजात वापर, विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवरील प्राध्यापक, अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सकारात्मक सहभाग या त्रिसूत्रीमुळेच विद्यापीठाला वेळेत निकाल जाहीर करणे शक्य झाले.

- डॉ. देवानंद शिंदे,
कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

परीक्षाविषयक कामकाजाची विचारपूर्वक तयारी, रोजच्या कामाचे सूक्ष्म नियोजन, तंत्रज्ञानाचा आवश्यकतेनुसार वापर हे वेळेत निकाल लावण्यासाठी महत्त्वाचे घटक ठरले आहेत. ३0, ४५ दिवस आणि यानंतर निकाल जाहीर झाल्यास त्याची माहिती सादर करण्याच्या योग्य पद्धतीमध्ये विद्यापीठ आघाडीवर राहिले आहे.

-डॉ. बी. एम. हिर्डेकर,
माजी परीक्षा नियंत्रक